# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


## पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/२४६ /२०२५ दि.०८/११/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी,** कल्याण डोबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक ०९/११/२०२५ रोजी पहाटे ०४:०० वाजेपासुन जिमखाना रोड डोंबिवली पुर्व व मदन ठाकरे चौक, फडके रोड डोंबिवली पुर्व या ठिकाणी डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण डोबिवली रनर्स ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने **"डोंबिवलीकर फ्रेंडशिप रन २०२५" मॅरथॉन कार्यक्रम** आयोजित आहे. सदर मॅरेथॉनमध्ये विविध धावपटु तसेच मा. श्री. रविंद्र चव्हाण, प्रदेशाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र राज्य तथा विधानसभा सदस्य १४३ डोंबिवली जि. ठाणे व इतर मान्यवर सहभागी राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद–** | कल्याण रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज सर्कलसर्कल डोबिंवली पुर्व येथुन टिळक चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना छत्रपती शिवाजी महाराज सर्कलसर्कल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची सर्व वाहने छत्रपती शिवाजी महाराज सर्कल ते टिळक चौक पर्यंत टिळक चौक ते छत्रपती शिवाजी महाराज सर्कल या मार्गावरून इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | छत्रपती शिवाजी महाराज सर्कल डोबिंवली पुर्व येथुन कल्याण रोडने टिळक चौक कडे येणाऱ्या के.डी.एम.टी, एन एन एम टी खाजगी बसेस व अवजड वाहनांकरिता **छत्रपती शिवाजी महाराज सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची सर्व वाहने छत्रपती शिवाजी महाराज सर्कल येथे यु टर्न घेवुन इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | डोबिंवली पश्चिमेकडुन ठाकुर्ली ब्रिजवरून डोबिंवली पुर्व कडे जाणाऱ्या वाहनांना बावन चाळ, **महात्मा गांधी रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची सर्व वाहने महात्मा गांधी रोडने कोपर ब्रिज वरून इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | डोबिंवली पुर्व येथील छत्रपती शिवाजी महाराज सर्कल येथुन कल्याण रोडने टिळक चौक मार्गे पाटणकर चौक (चार रस्ता) येथे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टिळक चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने उजवीकडे वळण घेवुन टिळक रोडने शहीद भगतसिंग रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | गिरणार चौक, आर पी रोड, कडुन चार रस्ता मार्गे टिळक चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गिरणार चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची सर्व वाहने गिरणार चौक मार्गे शिवमंदीर रोड अथवा नेरूरकर रोडने इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | फडके रोडवरील बाजीप्रभु चौक ते आप्पा दातार चौक पर्यत येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना संपुर्ण फडके रोड येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. **तसेच नो पार्किंग झोन करण्यात येत आहे.** |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची सर्व वाहने नेहरूरोड मार्गे डोंबिली स्टेशन कडे तसेच फडकेरोड कडे येणारी वाहने ही टिळक रोडने, सावरकर रोडने इंदीरा चौक मार्गे व डोंबिवली स्टेशन परिसरात इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ९० फीट रोडवरील ९० फीट कॉर्नर खंबाळपाडा गाव येथुन मोहन सृष्टी, ९० फीट रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **९० फीट कॉर्नर खंबाळपाडा गाव** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची सर्व वाहने मोहन सृष्टी ९० फीट रोड, कचोरे गाव ते ९० फीट कॉर्नर खंबाळपाडा गाव या मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ठाकुर्ली स्टेशन पुर्व व चोळेगाव तलाव रोड कडुन जुने हनुमान मंदीर मार्गे म्हसोबा चौक ९० फीट रोड कडे जाणाऱ्या वाहनांना **जुने हनुमान मंदीर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने पंचायत बावडी मार्गे सरदार वल्लभभाई पटेल रोड अथवा **ठाकुर्ली ब्रिज खालुन नेहरू रोड** या मार्गिकेवरून इच्छित स्थळी जातील. |

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद–** | डोबिंवली पुर्व, पाथर्ली रोडवरून शेलार चौक कडे व पाथर्ली गाव रोड मशाल चौकाकडे येणारी वाहतुक **शिवमंदीर, पाथर्ली रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने यु टर्न घेवुन ग्रोग्रासवाडी रोड मार्ग मानपाडा रोडने इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | डोंबिवली पुर्व गोपाळनगर गल्ली न. १, गोपाळनगर गल्ली न. २, गोपाळनगर गल्ली न. ३ येथुन कल्याण रोड कडे येणाऱ्या वाहनांना **गोपाळनगर गल्ली न. १ क्रॉस रोड , गोपाळनगर गल्ली न. २ क्रॉस रोड, गोपाळनगर गल्ली न. ३ क्रॉस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने ग्रोग्रासवाडी रोडमार्ग मानपाडा रोडने इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | डोंबिवली पुर्व टिळकनगर हायस्कुल रोड येथुन आर पी रोड कडे येणाऱ्या वाहनांना **टिळकनगर हायस्कुल रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने यु टर्न घेवुन ग्रोग्रासवाडी रोडमार्ग मानपाडा रोडने इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | स्व. इंदिरा चौकाकडुन मानपाडा रोड मार्गे चार रस्ता येथे जाणाऱ्या वाहनांना **स्व. इंदिरा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची सर्व वाहने स्व. इंदिरा चौक ते चार रस्ता पर्यंत चार रस्ता ते स्व. इंदिरा चौक या मार्गिकेवरून इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | डोंबिवली पुर्व पाथर्ली रोडकडुन टेम्पो स्टॅण्ड मार्गे जिमखाना रोड कडे जाणाऱ्या वाहनांना **टेम्पो स्टॅण्ड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने पाथर्ली रोड अथवा आईस फॅक्टरी मार्गे मानपाडा रोडने इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | डोंबिवली पुर्व डी एन एस बॅक कडुन टेम्पो स्टॅण्ड मार्गे जिमखाना रोड कडे जाणाऱ्या वाहनांना **डी.एन.एस. बॅक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने कल्याण शिळफाटामार्गे मानपाडा रोड ने इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | चोळेगाव रोड वरून बंदिश पॅलेस कै. फोशाबाई भोईर चौकमार्गे न्यु कल्याण रोड कडे येणाऱ्या वाहनांना **कै. फोशाबाई भोईर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने यु टर्न घेवुन जुने हनुमान मंदीरमार्गे पंचायत बावडी रोड अथव ठाकुर्ली ब्रिजखालील नेहरू रोड मार्गे व्ही पी रोड अथवा नेहरू रोड या मार्गिकेवरून इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | डोंबिवली पश्चिम महात्मा गांधी रोड बावनचाळ मार्गे राजीवनगर खाडी रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बावनचाळ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने महात्मा गांधी रोड मार्गे सुभाष रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | डोंबिवली पश्चिम राजीवनगर गणेश घाट/खाडी रोड कडुन बावनचाळ कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **राजीवनगर गणेश घाट/खाडी रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने वीर जिजाबाई भोसले रोड मार्गे सुभाष रोड या मार्गिकेवरून इच्छित स्थळी जातील. |

सदर वाहतूक अधिसूचना **दि.०९/११/२०२५ रोजी पहाटे ०४:०० ते सकाळी ०९:०० वा.** पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीस्तव,**

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,**

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.